जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२२/११/२०२३
## दि.२१/११/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ७०१/२०२३,भादविक ३०२,५०६ |
| **फिर्यादी** | कुमार प्रथमेश संतोष घुले,वय १९ वर्षे,रा.सर्व्हे नं.९६,घुले वस्ती,मांजरी बुद्रुक,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | संतोष राजेंद्र धोत्रे,वय-३७,रा.खंडोबामाळ,ता.हवेली,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/११/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा. ते ०१/३० वा.चे दरम्यान मौजे उरुळी देवाची गावातील खंडोबा माळ येथील मयताचे रहाते घराचे पार्किंग मधील पाण्याचे टाकी मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे चुलते दादा ज्ञानदेव घुले,वय ५० वर्षे,रा.खंडोबामाळ,उरुळी देवाची,पुणे यांची त्यांचेच चाळीत राहणारा भाडेकरु यातील नमुद इसम संतोष धोत्रे याने दारु पिल्यानंतर मोटार सायकल रेस करण्याचे कारणावरुन,त्यांचेमध्ये झालेल्या वादा-वादीतुन दादा घुले यांना मारहाण करुन,त्यांना पाण्याचे टाकीत बुडवून,त्यांचा खुन केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहायक पोलीस निरीक्षक, जितेंद्र खैरनार ८१०८७७२६२६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ७५२/२०२३,भादविक ३४१,२८३,१४३,४२७,५०४,५०६,महा.पो.का.क. ३७(१)(३)१३५ |
| **फिर्यादी** | विठठल चिपाडे, पोलीस अंमलदार, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | ०७ ते ०८ अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/११/२०२३ रोजी १८/३० वा ते रात्री २०/०० वा.चे दरम्यान विश्व जीम ते के.एन.के. सोसायटी लेन समोर,कात्रज-कोढवा रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी विश्व जीम ते के.एन.के. सोसोसायटी लेन समोर,कात्रज-कोढवा रोड, पुणे याठिकाणी बेकायदेशिररीत्या एकत्रीत जमुन,कोंढवा दिशेला जाणारी वाहने बेकायदेशिरपणे अडवून,त्या अडविलेल्या वाहनावरील चालकांना दमदाटी व शिवीगाळ करून वाहनांचे पुढील टायर मधील त्यांचे हातातील कशाचेतरी सहाय्याने हवा सोडून देवुन,ही वाहतुक समस्या सोडवा असे मोठ-मोठयाने आरडा-ओरडा करून,सार्वजनीक ठिकाणी शांततेचा भंग केला. तसेच पुर्णपणे वाहतुकीस अडथळा निर्माण करून,रस्ता वाहतुकीस बंद करून सार्वजनीक वाहतुक पुर्ण ठप्प केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अतुल थोरात |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ३७३/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,३४,महा.पो.का.क.३७(१)(३)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन मुलगा, वय १७ वर्षे,रा.क्रांती चौक,मुंढवा,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/११/२०२३ रोजी रात्री २२/०० वा.रेणुका माता मंदीरा समोर,केशवनगर,मुंढवा,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह जेवणाचा डबा आणणेकरीता मित्राची दुचाकी घेवुन केशव नगर येथे जावुन,परत रेणुकामाता मंदीर रोडने मुंढवा गावांकडे जात असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादीस थांबवुन,फिर्यादीस दुपारच्या भांडणात तु होता ना,तुला लय मस्ती आली होती ना,तुझी विकेटच टाकतो असे म्हणुन धारधार हत्यार काढुन,फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने,त्यांचे डोक्यात वार करून,दगडाने मारहाण करुन,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, समीर करपे ९९२३३२८४३३ |
| ४ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४७९/२०२३,भादविक ३९४,३२३,३४१,५०४,५०६(२),३४,महा.पो.का.क.३७(१)(३) १३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमी लॉ अमें.का.क.७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-१८,रा.अमर भारत सोसायटी,वारजे,पुणे |
| **आरोपीत** | चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/११/२०२३ रोजी रात्रौ ११/३० वा.सदगुरु किराणा स्टोअर जवळ,अमर भारत सोसायटी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र रोहित कुमार याचेसह मोटार सायकलवरून घरी जात असताना,यातील नमुद चार अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करुन,फिर्यादी यांना रस्त्या मध्ये अडवुन,त्यांचे हातांमधील धारधार हत्यार व लाकडी बांबुचा धाक दाखवुन,शिवीगाळ व धमकी देवुन,धारधार हत्याराचे उलटया बाजुने फिर्यादी यांचे कमरेवर व पायावर मारहाण करुन,त्यांचे पॅंटच्या खिशातील ७००/- रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढुन घेतले. तसेच आजु-बाजुच्या लोकांच्या दिशेने धारधार हत्यार भिरकावुन,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पाटील ९०२८७८४३४३ |
| ५ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ५९५/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | विनाद अडागळे,वय-४२ वर्षे,रा.सज्जनगड,लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १५/११/२०२३ रोजी १८/०० वा.ते दिनांक १९/११/२०२३ रोजी १९/३० वा.चे दरम्यान प्लॉट नं.७५,ए,स.नं.६/६/१/३,हिल व्ह्यु रेसींडसी,लेन नं.५,सज्जनगड,खंडोबा माळ,लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील ८,००० /- रुपये रोख व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण ३,७३,३००/- रूपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, साहेबा पोटे ७७४४८११११०० |
| ६ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३५५/२०२३,भादविक ३५३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक मनपा अधिकारी,वय-३६ वर्षे,सहा.अतिक्रमण निरीक्षक,सिंहगड रोड,क्षेत्रिय कार्यालय,पुणे |
| **आरोपीत** | एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/११/२०२३ रोजी १८/०० वा. पु.ल.देशपांडे उद्याना जवळ,सिंहगड रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे महानगरपालिका अतिक्रमन/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग येथे सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक म्हणुन काम पाहतात. फिर्यादी हे त्यांचे सोबत पुणे महानगर पालिका,अतिक्रमन विभागातील स्टाफ यांचेसह पु.ल.देशपांडे उद्याना जवळ,सिंहगड रोड,पुणे येथील अटी व शर्तीचे भंग करणा-या व्यावसायिकांवरती कारवाई करण्याचे दिलेल्या सुचने प्रमाणे अंमलबजावणी करण्याकरीता गेले असताना,यातील नमुद महिला हिने फिर्यादी हे करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण करुन,त्यांना अपशब्द वापरुन,त्यांना शासकीय काम करण्यापासुन प्रतिबंधीत केले व त्यांना बघुन घेण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जगदाळे ८१०८८००८४० |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे २८१/२०२३,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | विकास कोठारी,वय-४३ वर्षे,रा.मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०९/११/२०२३ रोजीपासुन दिनांक १२/११/२०२३ रोजीपर्यंतचे सकाळी १०/०० वा.पर्यत गगनविहार,गंगाधाम,मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची पत्नी हिचे हातातील सोन्याची डायमंड असलेली बांगडी त्यांनी त्यांचे राहते घराचे बेडरुम मधील साईड टेबलवर ठेवली असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांची नजर चुकवुन सोन्याची बांगडी ३,००,०००/- रूपये किमतीची चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, के.पी.जाधव ९६२३४५७५५४ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २९६/२०२३,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६६ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | तीन ते चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/११/२०२३ रोजी १५/१० वा. पद्मावती बसस्टॉप ते नातुबाग बस स्टॉप प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पद्मावती बसस्टॉप ते नातुबाग बस स्टॉप असा मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान,यातील नमुद इसमांनी बस मध्ये चढताना व चढल्यानंतर फिर्यादी यांचे आजुबाजुस दंगा मस्ती करून,त्यांचे उजव्या हातातील सोन्याची पाटली २५,०००/- रू किंची काढुन चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, सुशांत फरांदे ८८८८८२८००९ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ७००/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ६० वर्षे,रा.शेवाळेवाडी मांजरी फार्म,मांजरी-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/११/२०२३ रोजी दुपारी १२/३० वा.श्री माऊली कृपा कृषी सेवा केंद्र,प्रोपा.दुगाणे यांचे फर्टीलायझरचे दुकाना समोर कदमवाक वस्ती,पुणे-सोलापूर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे मोपेडचे डिक्की मध्ये ठेवलेले १,५४,०००/- रुपये रोख रक्कम व इतर महत्वाची कागदपत्रे असा ऐवज कोणीतरी अज्ञात इसमाने मोपेडची डिक्की उचकटवुन डिक्की मधील सदरचा ऐवज काढुन चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अमित गोरे ९६२३६४११०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**